सं.फौ. ख क्र. १५९/२०२३

दिलीप विरुद्ध मिलींद व इतर

**निशाणी क्र. ०१ चा भाग**

**फिर्यादीतर्फे साक्षीदाचा फौ. प्र.सं. कलम २०० प्रमाणे जबाब शपथेवर सुरू**

नावः  दिलीप पंडीत जाधव,

वयः  ३२ वर्षे    धंदाः मजुरी,

पत्ताः  गोळेगांव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद.

**फिर्यादीतर्फे श्री. व्ही. डी. जाधव यांच्याकडुन जबाब सुरू**

मी आरोपींना ओळखतो. दिनांक ३०/०५/२०२३ रोजी सकाळी ८.०० वा.चे सुमारास मी घरी पुस्तक वाचत होतो. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ हे अचानक माझ्या घरात घुसले व मला गलीच्छ भाषेत मादरचोद, हरमखोर, डुकरा अशी शिवीगाळ केली. तसेच तेंव्हा आरोपी क्र. १ ने चापट बुक्कयाने मला तोंडात, पोटात, पाठीवर मारहाण केली. त्यावेळी त्याने मला रक्कम रुपये २०,०००/- ची मागणी केली व पैसे नाही दिले तर तुला जिवंत मारुन टाकीन व तुझे टुकडे नदी नाल्यामध्ये फेकुन देईन अशी धमकी दिली. आरोपी क्र.२ हिने देखील मला भाडया भडव्या, काळया कुत्र्या व डुकराच्या जातीच्या अशी शिवीगाळ केली व तिने सुध्दा रक्कम रुपये २०,०००/- च्या मागणीसाठी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी आरडो ओरड केली असता त्यावेळी पंडीत जाधव व कमलबाई जाधव हे आले व त्यांनी मला आरोपींच्या तावडीतुन वाचवले. त्यानंतर मी खुलताबाद पोलीस स्टेशनला पोस्टाद्वारे लेखी अर्ज दिला तसेच मी पोलीस अधिक्षक कार्यालय औरंगाबाद येथे सुध्दा अर्ज दिला. परंतु पोलीसांनी काहीएक कारवाई केली नाही. म्हणुन मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली. आरोपीवर कठोर कारवाई व्हावी ही विंनती.

.....................

स्वाक्षरी

दिनांक : १०/०४/२०२४.

श्रवणोत्तर स्विकृती

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2024.04.10 15:21:09 +0530

(**व्ही. एच. खेडकर**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

खुलताबाद, औरंगाबाद